साप्ताहिक चपराक

चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

• वर्ष : १८
• अंक : २२
• पाने : ८
पुणे


मूल्य ६/-

www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner

■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants

For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.



Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111.
Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. २७ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | PRGI No. MAHMAR/2011/35979

# शिक्षणाचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर

**गेल्या काही दिवसात देशभर जे आंदोलन सुरू होतं त्याचे परिणाम दिसून आले आहेत. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा योग्य की अयोग्य? यावर चर्चा होतच राहील. या सगळ्यात विद्यार्थ्यांचा सहभाग आणि त्यांचा रोष यामुळे मात्र अनेकांना कानठळ्या बसल्या. विद्यार्थ्यांनी त्यांच्या न्याय हक्कासाठी एकत्र येणे, लढा देणे, संघर्ष करणे ही परंपरा तशी काही नवीन नाही. त्यात गैरही नाही; पण यातील मुले, विशेषतः मुली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ज्या अर्वाच्य, अश्लाघ्य भाषेत शिव्या देत होत्या ते पाहून कुणाचीही मान शरमेने खाली जाईल. त्यांचं वय, शिक्षण, अनुभव, अधिकार हे सगळं पाहता त्यांनी शासनाला विरोध करणं समजून घेण्यासारखं आहे मात्र देशाच्या पंतप्रधानाविषयी त्यांची भाषा कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही.**



**संपादकीय** — घनश्याम पाटील ७०५७२९२०९२

आपलं भविष्य पणाला लागलंय म्हणून टोकाचा विरोध करणं स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांचा हा राग समजून घेता येण्यासारखा आहे. न्याय मिळवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणं हाच तर लोकशाही व्यवस्थेचा गाभा आहे. असे असले तरी वैयक्तिक टीका, शिवीगाळ, द्वेषपूर्ण भाषा यातून काय साध्य होणार आहे? धोरणांवर, निर्णयावर टीका न करता थेट मोदींच्या हयात नसलेल्या आईचा उद्धार करणे हे अतिशय असंस्कृतपणाचे असून संपूर्ण देशाच्या थोबाडीत दिलेली ही चपराक आहे. नीटचे पेपर फुटणे, शैक्षणिक शुल्क आणि शिक्षणातील आरक्षण अशा काही मुद्द्यांवर यानिमित्ताने चर्चा झाली. डॉक्टर होऊ पाहणारे हे विद्यार्थी वैयक्तिक स्तरावर येऊन पंतप्रधानांना शिवीगाळ करत असतील तर ते त्यांच्या उद्देशापासून कोसो मैल दूर गेले आहेत असेच म्हणावे लागेल.

पेपर कसा फुटला? त्यात दोषी कोण आहेत? ज्या लाखो विद्यार्थ्यांचं वर्ष वाया गेलं त्याला जबाबदार कोण? ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या त्यांचं काय? यातून आलेल्या मानसिक ताणाला कसे सामोरे जायचे? हे प्रश्न रास्तच होते. जिथे गैरप्रकार घडले तिथल्या परीक्षा रद्द करून नव्याने घेण्यात आल्या. यातील दोषी तुरुंगात सडत असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. तरूणाईवर झालेला अन्याय आणि त्यांचा राग समजून घेत त्यांनी यात लक्ष घालून संबंधितांवर कठोर कारवाई केली. रात्री बारा वाजता ऑनलाईन येत संवाद साधला. 'आम्हाला राजकारण नको, न्याय हवा' असं म्हणत रस्त्यावर उतरलेली तरूणाई पाहून विरोधकांना चेव आला. भारतातील सर्व विरोधी पक्ष तरूणाईच्या बाजूनं उतरले. राहुल गांधी यांच्यापासून ते उद्धव ठाकरे यांच्यापर्यंत अनेकांनी जंग जंग पछाडलं. ज्येष्ठ नेते शरद पवार थेट पंतप्रधानांना जाऊन भेटले. सोनम वांगचुक यांनी उपोषणाची ताकद दाखवून दिली.

या सगळ्यात एक जमेची बाजू होती. सध्याच्या 'ट्रेंड'प्रमाणे सरकारने हे आंदोलन 'राष्ट्रविरोधी' म्हणून हाताळले नाही. काही केंद्रात गैरप्रकार झाल्याचे सुरूवातीलाच मान्य केले आणि संबंधितांवर कारवाईही केली. 'विद्यार्थ्यांची मागणी योग्य आहे,' याची सरकारला जाणीव होती. 'ज्यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला त्यांना सोडणार नाही,' हे मोदींचं सरुवातीपासूनचं धोरण होतं. विद्यार्थी आणि यानिमित्तानं जोडले गेलेले आंदोलक मात्र शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यावर ठाम होते. हा राजीनामा सुरुवातीलाच घेतला गेला असता तर या प्रकरणाला असे वळण मिळाले नसते. धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा होऊ नये आणि हे प्रकरण चिघळत राहावे यासाठी कोण प्रयत्नशील होते ते लपून राहिले नाही.

हे विद्यार्थी आंदोलन न राहता 'सरकारविरोधी आंदोलन' बनल्याचेही काहींनी सांगितले. काँग्रेस, टीएमसी, डीएमके, आप आणि इतर सर्वच डाव्या पक्षांनी विद्यार्थ्यांना सोबत घेऊन सरकारविरोधी मोर्चे काढले. 'तुमच्या घरातील मुलगा असता तर तुम्ही साथ दिली नसती का?' असे भावनिक प्रश्न त्यांनी उपस्थित केले. 'भाजप सरकार शिक्षणाकडे दुर्लक्ष करतंय' म्हणत संसदेत प्रश्न उपस्थित करण्यात आले. सरकारने सीबीआय चौकशी सुरू केली तरी विरोधकांचे समाधान नाही. 'शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा' या मागणीनंतर ज्या विद्यार्थ्यांनी पेपर फुटीमुळे आत्महत्या केल्या त्यांना प्रत्येकी एक कोटी रुपये द्यावेत अशी मागणी करण्यात आली. आता तर पंतप्रधानांच्या राजीनाम्याची मागणी सुरू आहे.

तरूणाई रस्त्यावर उतरली तर सर्वांचीच पळता भुई थोडी होते, हा इथल्या मातीचा इतिहास आहे. १९०५ साली बंगालमध्ये फाळणी रद्द करण्यासाठी विद्यार्थी रस्त्यावर उतरले होते. असहकार चळवळीत महात्मा गांधी यांच्या एका हाकेसरशी असंख्य विद्यार्थी रस्त्यावर आले. देशानं महागाई, बेरोजगारीच्या विरूद्ध एल्गार पुकारणारं जयप्रकाश नारायण यांचं आंदोलन बघितलं. अण्णा हजारेंचं आंदोलन बघितलं. या सगळ्यापेक्षा यावेळचं विद्यार्थी आंदोलन वेगळं आणि महत्त्वाचं होतं. अशा आंदोलनाकडं दुर्लक्ष करणं सरकारला परवडणारं नव्हतं. त्यामुळे आश्वासने देत-देत, वेळ काढत त्यांनी प्रतिसाद दिला. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामाही घेतला पण त्यामुळे या आणि अशा घटना पुन्हा होणारच नाहीत, असे नाही. कायद्याची कठोर अंमलबजावणी करत तसा धाक निर्माण करणं गरजेचं आहे. शिक्षणाकडं जे बाजार म्हणून, धंदा म्हणून पाहतात त्यांना वेळीच अद्दल घडवली पाहिजे. अन्यथा हे सारंच व्यर्थ आहे.

हे आंदोलन शंभर टक्के यशस्वी झालं असं म्हणता येणार नाही पण सरकारनं यावेळी इकडं दुर्लक्षही केलं नाही. हे दुर्लक्ष त्यांना परवडलंही नसतं. यानिमित्ताने शिक्षणाचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला हेच या आंदोलनाचं फलित म्हणावं लागेल.

प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सगळीकडेच सध्या जी अनास्था आहे त्यावर सातत्यानं चर्चा व्हायला हवी. अनेक शाळांतील सर्वच्या सर्व शिक्षक सध्या एसआयआरसाठी बाहेर पडल्यानं शाळा ओस पडल्या आहेत. प्रत्येक वेळी शाळाबाह्य कामासाठी शिक्षकांना जुंपले जाते. नीटच्या पेपर फुटीमुळं जे नुकसान होतंय तसंच किंबहुना त्यापेक्षा किती तरी जास्त नुकसान या आणि अशा कामांमुळं होतंय. त्याविरूद्ध कधी कोणी आंदोलन करेल किंवा नाही हे माहीत नाही पण या सगळ्यात बदल व्हायला हवेत. जोपर्यंत मूलभूत बदल होत नाही तोपर्यंत वरवरच्या सुधारणांना काहीच अर्थ नसतो असे म्हणतात. त्यामुळे हे बदल, या सुधारणा मूळातून व्हायला हव्यात. ज्यामुळे माणूस घडतो, ज्यामुळे राष्ट्र उभे राहते त्या शिक्षणाला आणि शिक्षण क्षेत्राला इतर कशाहीपेक्षा जास्त प्राधान्य द्यायला हवे. ते दिले तरच अशा आंदोलनातही पंतप्रधानांना शिवराळ भाषेत ट्रोल करणारी पिढी निपजणार नाही तर ती आपल्या न्याय-हक्कासाठी ठाम राहत, वैचारिक विरोध दर्शवत, कोणत्याही मस्तवालांना जागेवर आणू शकेल.

या आंदोलनामुळे शिक्षण घेण्यामागचा हा दृष्टिकोन विकसित झाला तरी ती मोठी उपलब्धी ठरेल.

■■



**अनिल दातीर**
सातारा, ९४२०४८७४१०

**व्हिएतनाम : भाग एक**

**साताऱ्यातील प्रसिद्ध वास्तुविशारद अनिल दातीर यांनी जगभर भटकंती केली आहे. त्यांनी त्यांच्या 'परदेशातील पाऊलखुणा'या पुस्तकातून अनेक देशांची वाचकांना सफरही घडविली आहे. अशाच एका भारावून टाकणारा व्हिएतनामच्या अफलातून चित्तवेधक प्रवासाची मालिका त्यांच्याच शब्दात...**

# व्हिएतनामची अफलातून सफर



**सालाबादप्रमाणे बिल्डर्स असोसिएशनच्या यावर्षीच्या परदेशातील सहलीच्या चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. सुरुवात 'फॅमिली ट्रिप करू या' पासून झाली. फॅमिली ट्रिप म्हटलं की मीटर गुणिले दोन किंवा मुलंबाळं न्यायची असतील तर तीन ने चारने आकडा वाढत जाणार. त्यामुळे हा मुद्दा लवकरच निकाली निघाला. पुढे परत बजेटचा मुद्दा आला. 'सर्वांना परवडेल, असे ठिकाण पाहुयात.' त्यामुळे अडीच-तीन लाखांच्या वर जाणारे युरोप मागे पडले. (माझ्या युरोपच्या अगोदरच चार सहली झाल्या आहेत). व्हिएतनाम फायनल होत होते पण येऊ इच्छिणाऱ्या बऱ्याच जणांचे व्हिएतनाम अगोदर पाहून झाले होते. (मीही दुसऱ्या एखाद्या ग्रुपबरोबर वुईथ फॅमिली नियोजन करण्याच्या प्रयत्नात होतो.)**

टर्की किंवा जॉर्जिया-अझरबैजान असे अजून दोन ऑप्शन्स होते पण जॉर्जियात प्रवेश देताना भारतीय पर्यटकांना विनाकारण अडकवून ठेवल्याच्या किंवा एकाच ग्रुपमधील काहीजणांना प्रवेश न देता परत पाठवल्याच्या घटना गेल्या वर्षभरात घडल्याचे ऐकले होते. त्यामुळे उगाच 'रिस्क नको' या मतावर बऱ्याच जणांचे एकमत झाले. त्यातही टर्की आणि अझरबैजान यांनी ऑपरेशन सिंदूरच्या वेळी पाकिस्तानला मदत केल्याने अनेक भारतीय पर्यटकांनी या देशांना जाणे बंद केले आहे. आम्हीही या मुद्यावरच टर्की-अझरबैजानवर फुली मारली आणि येतील ते येतील या तत्त्वावर व्हिएतनाम फायनल केले.

सहलीचे अक्षरश: पंधरा दिवसात नियोजन झाले. अगोदर बारा जणांची विमानांची तिकिटे काढली नंतर अजून दोन, अजून एक, अजून एक करत करत सतरा जण झाले. उशिरामुळे काहींना एक्स्ट्रा चार्जेस भरावे लागले. दोन-तीन जणांच्या पासपोर्टची मुदत संपली होती. मग अर्जंट अपॉइंटमेंट घेऊन, अतितातडीची चक्रे फिरवून जुगाड झाले. सहलीच्या नियोजनातील सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो तो व्हिसाचा. युरोपवाल्यांना पंधरा-वीस दिवस वाट पाहावी लागते. अमेरिकेसाठी तर लोक देव पाण्यात बुडवून वाट पाहत बसतात. हा व्हिएतनाम तसा भारताचा पर्यटनातला चांगला मित्र आहे. त्यामुळे तीन-चार दिवसात व्हिसा हमखास येतोच. तोही कोणतीही अपॉइंटमेंट न घेता. पासपोर्ट आणि पॅनकार्ड सोडून दुसरी कुठलीही कागदपत्रे न जोडता फक्त ऑनलाईन अर्ज करून व्हिसाचा प्रश्न मार्गी लागतो. तरी पण उशिरा अर्ज केल्यामुळे आमच्यातील एकाचा व्हिसा ट्रीपच्या आदल्या दिवशी आला आणि दुसऱ्याचा तर मुंबईच्या वाटेवर असताना लोणावळ्याजवळ आला आणि बिचाऱ्याचा जीव भांड्यात (की विमानात) पडला.

आमचे पॅकेज अगोदर सेव्हन नाईट्स एट डेज असे होते पण मला फुकॉक आयलँड्सचा शोध लागला होता. ते झालेच पाहिजे या आग्रहाखातर अजून दोन नाईट्स आणि पंचवीस हजार वाढले. व्हिएतनामला आतापर्यंत बरेच जण जाऊन आले असतील पण या फुकॉक आयलँड्सला फार कमी जण गेले असतील. हे आयलँड्स पर्यटनासाठीच डेव्हलप केलेत आणि ते जरा महागडे असल्याने बरेचसे स्टॅण्डर्ड टूरवाले बजेटचा विचार करून हे सजेस्ट करत नाहीत. यामुळे २५-३० हजार वाढले की लोकांना पॅकेज महाग वाटते. आमचं पॅकेज एक लाख पासष्ठ हजार रुपयात झाले होते. ते ऐकून अनेक जण 'असं असतंय व्हय, आम्ही लेका एक दहात जाऊन आलोय' असे म्हणत होते. आम्हाला माहीत होते की किंमत का वाढतेय! कंपलसरी फाईव्ह स्टार हॉटेल्स, लक्झरी ट्रॅव्हल्स, डोमेस्टिक एअरलाईन ट्रान्स्फर आणि सातारा ते सातारा असं म्हटल्यावर पॅकेज वाढणारच.

ग्लोबल हॉलीडेजच्या अल्ताफ पठाण यांनी नेहमीप्रमाणे आमच्या टूर आमच्या सोयीनुसार व्यवस्था करून दिली. तेही सोबत असलेच पाहिजे हीही आमची अट असते.

मुंबई एअरपोर्टला वेळेत पोहोचणे हा सध्या एक काळजीचा मुद्दा होऊ लागलाय. आमची फ्लाईट रात्री अकराची असल्याने आठपर्यंत पोहोचने गरजेचे होते. गेल्या महिन्यातला अनुभव पाहता रिस्क नको म्हणत आम्ही सकाळी साडेदहालाच सातारा सोडलं. जेवायला पनवेल गाठलं. इथे एक मावशीची खानावळ आहे. त्यासाठी मुंबई एक्स्प्रेस सोडून पनवेल गावात उतरावं लागतं पण अतिशय सुंदर असे पॉपलेट-सुरमई माशांचे जेवण इथे मिळाले. आवर्जून वाकडी वाट करून इथे जेवायला जावं, अशी ही खानावळ आहे. पुढच्या प्रवासात नंतर बऱ्याच वेळा वाहतूक कोंडीत अडकलो. साताऱ्याहून सकाळी निघालेलो आम्ही मुंबई एअरपोर्टला आठ वाजता पोहोचलो. दुपारी जेवण करून निघायच्या प्लॅनने नक्कीच घोळ केला असता. हा वाहतूक कोंडीचा मुद्दा लवकरच निकाली निघेल, असे वाटतंय. लोणावळा घाट स्किप करणाऱ्या अंडरग्राऊण्ड मिसिंग लिंकचे काम अंतिम टप्प्यात आहे आणि नवी मुंबईच्या नवीन एअरपोर्टवरून इंटरनॅशनल फ्लाईट्स रेग्युलर येऊ-जाऊ लागल्या की आपल्याला ते सोयीचे होईल. सुदैवाने मुंबई एअरपोर्टला गर्दी जरा कमी होती. त्यामुळे सिक्युरिटी चेक-बॅगेज ड्रॉप-इमिग्रेशन चेक लवकर पार पडले. मुंबई एअरपोर्टला गेल्यावर नक्कीच आपल्या भारताचा अभिमान वाटल्याशिवाय राहत नाही, इतके ते सुंदर आहे. रात्री अकराला व्हिएतनामच्या एअरलाईन्सच्या विमानाने टेक ऑफ घेतला आणि थोड्या वेळातच एकसुरी विमानप्रवास सुरू झाला. विमानात बऱ्याच सीट रिकाम्या होत्या. काही जण तर सरळ तीन सीटवर आडवे झाले होते. सकाळी साडेसहाला आम्ही हो ची मिन्ह सिटीच्या TAN SON NHAT एअरपोर्टला उतरलो. हो-ची-मिन्ह सिटीमधला हा सिटी शब्द आपल्याकडच्या नगर या अर्थाने वापरला जातो कारण हो ची मिन्ह हे व्हिएतनाममधील एका प्रसिद्ध व्यक्तिचे नाव आहे. त्यांच्या नावावरून या शहराचे सायगाव हे जुने नाव बदलून 'होची मिन्ह सिटी' असे नामकरण करण्यात आले.

पंडित नेहरूंची आणि हो ची मिन्ह यांचीही चांगली मैत्री होती. व्हिएतनामच्या स्वातंत्र्यानंतर तिथे भेट देणारे पहिले परदेशी पंतप्रधान म्हणून नेहरूंची नोंद आहे. सकाळी साडेसहाला आम्ही पोहोचलो. सर्वसाधारणपणे हॉटेलमधील खोल्या दुपारी दोनला ताब्यात मिळतात पण एक्स्ट्रा चार्जेस भरून अर्ली चेकिनची व्यवस्था केल्याने आम्हाला खोल्या लगेच मिळाल्या. थोडासा आराम आणि नाश्ता उरकून साडेदहाला लॉबीत यायचे हे ठरवून आम्ही `MUONG THANH LUXURY HOTEL' च्या आरामदायक खोल्यांमध्ये गडप झालो.

**(पुढचा प्रवास पुढच्या भागात)**

## शिवाजी महाराजांच्या रणनीतीचा अभ्यास करणारे हो ची मिन्ह

**आपल्याकडे जसे आंबेडकरनगर, कल्याणीनगर, विकासनगर असते तसे हे हो ची मिन्हनगर. हो-ची मिन्ह (कालखंड-१८९०-१९६९) हे व्हिएतनाममधील एक आद्य क्रांतिकारक, कम्युनिस्ट नेते आणि स्वतंत्र व्हिएतनामचे पहिले राष्ट्रपती होते. त्यांनी तीस वर्ष फ्रांस आणि अमेरिकेसारख्या बलाढ्य देशांशी आपल्या तुटपुंज्या शिपायांच्या जोरावर निर्णायक लढा दिला. यासाठी त्यांनी आपल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गनिमी कावा म्हणजेच त्यांच्या भाषेत गुरिल्ला वॉर या युद्ध नीतीचा वापर केला. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल व्हिएतनामी लोकांना विशेष आदर आहे. जेव्हा समोरचा शत्रू ताकदवर असेल आणि आपण कमजोर असू तेव्हा सरळ न भिडता छुपे हल्ले करून शत्रूचे जास्तीत जास्त नुकसान करणे आणि त्याला जेरीस आणणे अशा महाराजांच्या रणनीतीचा या हो ची मिन्ह साहेबांनी चांगला अभ्यास केला होता, असे म्हणतात. याला तसा काही लेखी पुरावा मात्र मला सापडला नाही. त्यामुळे ही माहिती चुकीचीही असू शकेल. विशेष म्हणजे हे हो ची मिन्ह गांधीजींचा अहिंसा मार्गही मानत होते पण त्याचवेळी स्वातंत्र्य हवे असेल तर शस्त्र हाती घेतल्याशिवाय पर्याय नाही, असा लेनिनच्या विचारांचा क्रांतिकारी मार्गही वापरत होते.**

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# टाळूवरचं लोणी गिळलंय कोणी...?



जनार्दन देवरे
मनमाड
९०११६९४८८५



## मसाला पान

(या लघुनाट्यांशातील सर्व पात्रे व घटना काल्पनिक असून ती कुणाच्या व्यक्तिमत्त्वाशी वा घटनांशी जुळून आल्यास तो निखळ योगायोग समजावा. - लेखक )

----------------------

(फाकडोजी महाराज, सेवक व प्रधानजी वेषांतर करून एका गावात प्रजेची मते ऐकण्यासाठी आले आहेत. भुरभूर पाऊस सुरू असल्याने तिघांनीही रेनकोट घातले आहेत. डोक्यावर छत्र्याही धरल्या आहेत. वेळ सायंकाळची. पत्र्याच्या शेडचा आडोसा असलेल्या एका दुकानाजवळ थांबतात.)

**दुकानदार** : रामराम पाव्हणं! बोला, काय पाहिजे? अन् एवढ्या पाऊसपाण्यात इकडं कुठं? कुठले पाहुणे म्हणायचे? दिंडीत वाट चुकलात की काय?

**सेवक** (छत्री बंद करत) : काही नाही हो. जरा उशीरच झाला घरून निघायला अन् वाटही चुकलो वाटतं! वाटेगावच आहे ना हे?

**दुकानदार** : व्हयं, व्हयं. वाटेगावच आहे की हे! कुणाकडं आलात आपण?

(तिघेही गोंधळतात. प्रधानजी स्वतःला सावरत बोलतात.)

**प्रधानजी** : इथं नाही भेटायचं हो कुणाला, पुढच्या गावी जायचंय भाटगावला. (विषय बदलत)

ते फुटाणे देता का जरा पावशेर?

**दुकानदार** : कोणते देऊ? खारे की बिगर मिठाचे?

(प्रधानजी महाराजांकडे पाहतात. महाराज खाऱ्या फुटाण्याच्या बरणीकडे बोट दाखवितात.)

**प्रधानजी** : द्या ते खारेच द्या आणि जरा चहा वगैरे इथं मिळेल का कुठं?

(दुकानदार कागदात फुटाणे बांधून देतो. ते सेवक घाईघाईने घेतो.)

**दुकानदार** : अहो पाहुणं चहा मीच बनवून देतो की! इथंच या दुकानाच्या मागच्या खोलीत चहा बनवतो आणि आणून देतो की! चहाचा बी धंदा आहे की आपला.

**सेवक** : अरे व्वा ! म्हणजे टू-इन-वन ! याला म्हणतात उद्योजकता!

**दुकानदार** : टू-इन-वन नाही. थ्री-इन-वन म्हणा पाहुणे. पान स्टॉल पण हाय आपलं. हे बघा फ्रीजमध्ये सकाळी घरून येतानाच तीसेक पान लावून आणतो. आमची मिसेस हे पानं लावायचं काम लयी भारी करती बघा. कलकत्ता म्हणू नका की बनारस. एकदम बेस्ट!

(फ्रीज उघडून दाखवितो.)

**महाराज** : पुना मसाला पान आहे का?

**दुकानदार** : मग, आहे की एकदम गुलकंद मीठा!

**महाराज** (उत्साहाने) : व्वाह! मस्तच. झालंच मग आमचं काम सोळा आणे...!

(दुकानदार आत जातो.)

**प्रधानजी** : महाराज , काय हे..? अहो इथलं पान?

**महाराज** : प्रधानजी शांत राहा. महाराज नका म्हणू हो. संशय येईल की या दुकानदाराला! आणि समोर बघा की, त्या खिडकीतून कुणी तरी पाहतंय आपल्याला. सावध राहा जरा!

**प्रधानजी** ( कानाला हात लावत) : क्षमा असावी पण तुमचा उत्साह पाहून राहवलं नाही हो! आणि आलं तोंडात.

**सेवक** (गालात हसत) : घ्या आता हे खारे फुटाणे. प्रधानजी घ्या की तुम्हीही!

**प्रधानजी** : प्रधानजी नाही रे! दादाभाऊ म्हण.

**सेवक** (स्वतःवरच नाराज होत) : स्वॉरी हं!

(तिघेही फुटाणे खाऊ लागतात. तेवढ्यात दोन तरुण दुकानासमोर येतात)

**दोघे तरुण** : रमाअण्णा दोन बटणं द्या हो..!

(सेवककाकडे निरखून पाहत एक तरुण जवळ येत.)

**एक तरुण** : कोण हो तुम्ही? या गावात तर कधी दिसला नाहीत?

**सेवक** (चाचरत) : मी... मी सखा बापू उंबरे, कन्हेरवाडीचा.

**दुसरा तरुण** : आणि हे दोघं?

**सेवक** (प्रधानजींकडे पाहत) : हे आमचे दादाभाऊ नाईक आणि (महाराजांकडे बोट दाखवत) हे माझे काका संभाजी उंबरे. आम्ही सारे कन्हेरवाडीचेच. पुढं जरा भाटगावला जायचयं आम्हाला. तिथं आज दिंडीचा मुक्काम हाय...!

**प्रधानजी** : आणि आम्ही हायवेने जाण्याऐवजी मधल्या रस्त्याने निघालो तर रस्ताच चुकलो बघा.

**एक तरुण** : बरं ! पण अण्णा कुठं गेलेत?

**सेवक** : ते मधी गेलेत. चहा बनवताहेत.

**तरुण** : रमाण्णा, ओ रमाण्णा ! या की जरा बाहेर. दोन बटणं द्या.

(आतल्या खोलीतून आवाज)

**दुकानदार** : आलो रे आलो नंद्या! थांब जरा. चहा गाळतोय.

**दुसरा तरुण** : या लवकर! हा रमाण्णा म्हणजे लयीच उद्योगी माणूस..! सगळे उद्योग एकटाच करतोय.

(दुकानदार चहाची किटली आणि चार ग्लास घेत बाहेर येतो. काऊंटरवर ते ठेवत)

**दुकानदार** : बोल रे काय हवं ते? आणि नंदूशेठ आज हा मधू तुझ्याबरोबर कसा? काल तर इंटरव्यूला जाणार होता ना बँकेत?

**मधू** : अहो लई मोक्कार पाऊस झाला तिकडं, दरडी कोसळल्यात, रस्ते खचलेत, रस्त्यावर कंबरेएवढं पाणी, कसं जाणार मग? केलं कॅन्सल!

**नंदू** : अण्णा, ते जाऊ द्या, आधी दोन बटणं द्या बरं. गारव्यानं पार अंग धरलंय हो!

(दुकानदार दोन सिगारेट व आगपेटी काढून देतो.)

**दुकानदार** : हे घे! अन् जा तिकडे आडोश्याला. इथं नका धूर उधळू.. निघा! तीस रुपये दे!

(एक तरुण मागच्या खिशातून तीस रुपये काढून देतो तर दुसरा सिगारेटी व काडीपेटी उचलतो व दोघेही समोरच्या पडक्या घराच्या आडोशाला जातात.)

**दुकानदार** (ग्लासात चहा ओतत) : माफ करा माउली! पण ही पोरं ना...! हं घ्या चहा! अगदी मस्त बनवलाय हं. कसा झाला ते सांगा. अजून काही सेवा..?

> **वेलची**
>
> **एकाची जळते दाढी**
> **अन् दुसरा त्यावर पेटवी विडी.**

**महाराज** (चहाचा ग्लास हातात घेत) : नको काही. बसा जरा आमच्या सोबत आणि तुम्हीही घ्या की चहा!

(दुकानदार चहा घेत स्टूलवर बसतो.)

**प्रधानजी** (दुकानदाराकडे पाहत) : हे सिगारेटला बटण काय म्हणतात हो?

**दुकानदार** (चहाचा घोट घेत) : ते काय हाय पाव्हण, अहो आता सिगारेटला एक छोटं बारकं बटण येतं आता. ते उघडलं की, मेन्थॉलचा नाही तर फळांचा सुगंध येतो म्हणे धुराला आणि ओढताना त्रास नाही होत म्हणे. म्हणून ही बटणची सिगारेट. साधी जरा कडक असते ना! म्हणून पोरं आता ही ओढतात. शहरातून शिकून आलेल्या पोरांचं पाहून गावातील पोरंही बटणच मागतात.

**महाराज** (चहाचा ग्लास खाली ठेवत) : असं आहे तर हे! आजपर्यंत हे काही ऐकलं नव्हतं बुवा!

**सेवक** : ऐकावं ते नवलच! काय घडलं आणि कसं कसं बिघडल काहीच नाही सांगता येत हल्ली..!

**दुकानदार** : चालायचंच हो पाहुणे..! काळच असा आहे हा. या पोरांच्या हाताला काम नाही, शेतात काम करायची इच्छा नाही, आईबापांचे एकुलते एक..! बोललं तर अपमान वाटणार, चिडचिड करणार. सोडताही येत नाही अन् धरताही येत नाही. आता आमचंच बघा ना, आमचा पक्या..

**महाराज** : कोण पक्या? आणि काय झालं त्याचं?

**दुकानदार** : आमचा मुलगा हो! चांगला डिप्लोमा झालाय पण कंत्राटी नोकरीला नाही म्हणतो. आता कुठं परमनन्ट नोकऱ्या राहिल्यात का...? पण नाही, म्हणे खाईन तर तुपाशी...! परवा सांगायला गेलो आम्ही दोघं त्याला की, बाबा दुकानात बैस. शिकून घे. चांगला धंदा हाय पण म्हणतो कसा, धंद्यात राम नाही राहिला, चिल्लर कुठं गोळा करत बसू मी?

**महाराज** (उत्सुकतेने) : मग?

**दुकानदार** : मग काय, गेला निघून परवापासून कुठं तरी. आता आमची ही जिवाला खात बसलीय. बेकार त्रांगडं हाय हो! आजकालची पोरं स्वप्न लयीच मोठमोठी पाहतात पण मेहनत छटाकभर पण करत नाहीत. बरं साधं बोललं तरी अपमान, स्वाभिमानाला ठेच वगैरे! साराच वैताग!

**सेवक** : हो की, जरा काही झालं की अपमान. कधी माझा अपमान, कधी माझ्या गावचा अपमान तर कधी महाराष्ट्राचा अपमान? कुणी म्हणतं देशाचा अपमान!

**दुकानदार** : अहो पण मग चुका पण लक्षात आणून द्यायच्या नाहीत का?

**महाराज** (प्रधानजींच्या कानात) : लक्षात ठेवा हे काय म्हणताहेत ते. नाही तर लिहून घे. फार महत्त्वाचा मुद्दा आहे हा!

**प्रधानजी** : होय जी! ठेवतो ध्यानात सारं.

**सेवक** (महाराजांकडे पाहत) : चलायचं का आता पुढं?

**प्रधानजी** : निघूयात आता. जनतेचे आणखी काही प्रश्न जाणून घेऊ यात.

**महाराज** (दुकानदाराकडे पाहत) : चला, येतो आम्ही. आमचं एक मसाला पान द्या तेवढं आणि तुमचे बील सांगा किती झाले ते.

**दुकानदार** (फ्रिजमधून पान काढत) : तुमचे बघा पंचवीस अन् तीस अन् पानाचे पंधरा. असे एकूण सत्तर रुपये झाले बघा पाव्हणं!

(महाराज प्रधानजींकडे पाहतात)

**प्रधानजी** (दुकानदाराला पैसे देत) : हे घ्या शेठ! येतो आम्ही..!

(मघाचे ते दोघे तरुण परत येतात व काडीपेटी दुकानदाराला देत परतू लागतात.)

**महाराज** (तरुणांकडे पाहत) : का रे चालतात? थांबा की जरा बोलायचयं तुमच्याशी.

**एक तरुण** (उर्मटपणे) : काय बोलणार काका? आणि तुम्ही कायं आमचं दुःख हलकं करणार?

**महाराज** : तसं नाही पण म्हटलं जाणून घ्यावं युवकांचं म्हणणं! त्यांच्या काही अडचणी वगैरे..?

**दुसरा तरुण** : बेकारांचं दुखणं काय सांगावं काका? जिथं तिथं पैसा लागतो हल्ली, आणायचा कुठून पैसा? कुठंही नोकरीचा अर्ज भरायचा म्हटला की पैसे लागतात. शासकीय नोकऱ्यांसाठीही प्रवेश शुल्क नाही तर आवेदन शुल्क किंवा परीक्षा फी भरावी लागते. तीही पाचशे रुपयांच्या पुढंच.

**सेवक** : म्हणजे आता तेच नोकरी नसलेले अन् फी काय भरणार? खासगी कंपन्यांचं ठीक आहे पण सरकारही पैसे घेतं. नाडतंय बिचाऱ्यांना!

**दुसरा तरुण** : अहो काका कंत्राटी नोकऱ्यांसाठी ही आवेदन शुल्क आकारतात. एक उदाहरण देतो. बघा, तलाठी भरतीचे आवेदन शुल्क पाचशे रुपये. लाखो तरुण अपेक्षेने उधार उसनवारी करून अर्ज भरणार. करा हिशेब पाचशे गुणिले एक लाख किती झाले?

**प्रधानजी** : पाच कोटी! बापरे!

**पहिला तरुण** : म्हणजे सरकार पाच कोटी कमावणार? आणि एखादा उमेदवार कोर्टात गेला की लटकली भरती वर्ष दोन वर्षे. मग पुन्हा नवी जाहिरात, नवे शुल्क अन् नवी पायपीट ..!

**महाराज** : हे धक्कादायकच आहे सारं ..! म्हणजे नोकर भरती हा एक धंदाच झालाय. (प्रधानजींकडे रागाने पाहत.) काय चाललंय हे?

**सेवक** : हे म्हणजे मयताच्या टाळूवरचं लोणी खाणंच की..? सारंच मिसिंग मॅनेजमेन्ट आहे हे!

**दुकानदार** : मिसिंग नाही सारंच फिक्सिंग!

**महाराज** (संतापत) : चला निघू या आता!

**प्रधानजी** : अहो असं काय करता? कुठे निघालात एवढ्या तावातावाने?

**महाराज** (चिडतच) : टाळूवरचं लोणी, खाल्लंय कोणी? हे शोधायला..! चला! (महाराज तरातरा चालू लागतात. त्यांच्या मागे प्रधानजी व सेवक स्वतःवरच चिडल्यासारखं करीत पाय आपटत धावतात.)

**दोघे तरुण** (आश्चर्यचकित होत) : का हो निघालात? आणि तिकडे कुठे? अहो, दिंडी इकडं भाटगावला..! समोरचा रस्ता नाही, हा पाठीमागचा रस्ता धरा..!

(दुकानदार चकीत होत पाठमोऱ्या पाहुण्यांकडे पाहतो.

( पडदा पडतो.)

■■

# बचत खाते उघडण्याची प्रक्रिया आणि नियम



श्रीराम नानल
सातारा भ्रमणध्वनी : ९६३७१३३२८०

भाग २

**भारतीय बँकिंगमध्ये बचत खाते उघडण्यासाठी काही मूलभूत नियम आणि प्रक्रिया आहेत. हे नियम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि संबंधित बँकांद्वारे निर्धारित केले जातात.**

## नियम आणि प्रक्रिया:

● **पात्रता**

● **व्यक्ती :** कोणताही भारतीय नागरिक, मग तो निवासी असो किंवा अनिवासी बचत खाते उघडू शकतो.

● **अल्पवयीन :** अल्पवयीन मुलांसाठीही खाते उघडता येते, परंतु ते साम ान्यतः पालकांच्या किंवा कायदेशीर पालकांच्या देखरेखीखाली चालवले जाते. जेव्हा अल्पवयीन व्यक्ती १८ वर्षांचा होतो, तेव्हा ते खाते पूर्णपणे त्याच्या नावावर हस्तांतरित केले जाते.

● संयुक्त खाते दोन किंवा अधिक व्यक्ती संयुक्तपणे बचत खाते उघडू शकतात.

## आवश्यक कागदपत्रे

रिझर्व्ह बँकेच्या आपल्या ग्राहकाला जाणून घ्या (Know Your Customer - KYC) नियमांनुसार, बचत खाते उघडण्यासाठी खालील कागदपत्रे आवश्यक आहेत:

● ओळखीचा पुरावा ● पॅन कार्ड ● आधार कार्ड
● पासपोर्ट ● मतदार ओळखपत्र ● ड्रायव्हिंग लायसन्स ● नरेगा जॉब कार्ड (वरीलपैकी कोणतेही एक) ● पत्त्याचा पुरावा ● आधार कार्ड ● पासपोर्ट ● मतदार ओळखपत्र ● ड्रायव्हिंग लायसन्स
● युटिलिटी बिले (जसे की वीज बिल, टेलिफोन बिल) जी दोन म हिन्यांपेक्षा जुनी नसावी. मोबाईल नंबरचे बिल पत्त्यासाठी स्वीकारले जात नाही.
● मालमत्ता कर पावती सुद्धा पत्त्याचा पुरावा म्हणून स्वीकारली जाते.
● अलीकडील छायाचित्र : सामान्यतः पासपोर्ट आकाराची दोन छायाचित्रे लागतात.
● पॅन कार्ड : हे अनिवार्य आहे. जर पॅन कार्ड नसेल, तर फॉर्म ६० किंवा फॉर्म ६१ भरावा लागतो.

## खाते उघडण्याची प्रक्रिया :

● बँक निवड : तुम्हाला ज्या बँकेत खाते उघडायचे आहे, ती बँक निवडा.
● अर्ज फॉर्म भरणे : बँकेतून बचत खाते उघडण्याचा अर्ज घ्या आणि तो काळजीपूर्वक भरा. यामध्ये तुमचे नाव, पत्ता, संपर्क तपशील, नॉमिनीचे तपशील इत्यादी माहिती भरावी लागते.
● केवायसी प्रक्रिया : आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रती आणि छायाप्रती सोबत बँकेत सादर करा. बँक अधिकारी मूळ प्रती पडताळून पाहतील आणि छायाप्रती त्यांच्या नोंदीसाठी घेतील.
● सत्यापन : काहीवेळा बँक तुमच्या पत्त्याचे किंवा इतर तपशीलांचे सत्यापन करू शकते.
● प्राथमिक जमा : बहुतेक बँकांना खाते उघडताना किमान रक्कम जमा करावी लागते. ही रक्कम बँकेनुसार बदलते.
● स्वाक्षरी : तुम्हाला बँकेसमोर स्वाक्षरी करावी लागते, जी भविष्यातील व्यवहारांसाठी वापरली जाते.
● खाते सक्रियकरण : सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर आणि बँकेने तुमचे अर्ज मंजूर केल्यावर, तुमचे बचत खाते सक्रिय होते. तुम्हाला पासबुक, चेकबुक आणि डेबिट कार्ड (एटीएम कार्ड) मिळते.

## नॉमिनेशन :

● बचत खाते उघडताना नॉमिनीचे नाव देणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि अनिवार्य आहे. यामुळे खातेधारकाच्या दुर्दैवी निधनानंतर खात्यातील रक्कम कायदेशीर वारसाला मिळण्याची प्रक्रिया सोपी होते.
● तुम्ही एकापेक्षा जास्त नॉमिनी नेमू शकता आणि त्यांचे वाटप देखील निश्चित करू शकता.

## बँकेचे नियम आणि शुल्क :

● प्रत्येक बँकेचे बचत खात्यासाठी वेगवेगळे नियम आणि शुल्क असू शकतात, जसे की:
● किमान शिल्लक : काही बँकांमध्ये किमान शिल्लक ठेवणे बंधनकारक असते आणि ती न ठेवल्यास दंड लागतो.
● एटीएम व्यवहार शुल्क : विनामूल्य व्यवहारांची संख्या संपल्यावर शुल्क लागू होऊ शकते.
● चेकबुक शुल्क :
● एसएमएस अलर्ट शुल्क :
● खात्याचे स्टेटमेंट शुल्क
● खाते उघडण्यापूर्वी संबंधित बँकेच्या सर्व नियमांची आणि शुल्कांची माहिती घेणे महत्त्वाचे आहे.


## विविध प्रकारची बचत खाती :


बँका विविध प्रकारची बचत खाती देतात, जी वेगवेगळ्या गरजा पूर्ण करतात.
● नियमित बचत खाते : सामान्य वापरासाठी.
● पगाराचे खाते : कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांसाठी उघडतात, ज्यात सामान्यतः किमान शिल्लक ठेवण्याची अट नसते.
● अल्पवयीन खाते : मुलांसाठी.
● ज्येष्ठ नागरिक खाते : ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा आणि उच्च व्याजदर.
● महिला खाते : महिलांसाठी विशेष लाभ.

## बचत खात्याचे फायदे :


● सुरक्षित बचत : आपले पैसे बँकेत सुरक्षित राहतात.
● व्याजाची कमाई : बचत खात्यातील रकमेवर बँक व्याज देते.
● सुलभ प्रवेश : एटीएम, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंगद्वारे कधीही पैशांवर प्रवेश मिळतो.
● व्यवहारांची नोंद : पासबुक आणि स्टेटमेंटमुळे सर्व व्यवहारांचा तपशील उपलब्ध असतो.
● बिल भरणे : ऑनलाइन बिल भरणा आणि फंड ट्रान्सफरची सुविधा.
● कर्ज मिळवणे : चांगले बँकिंग रेकॉर्ड भविष्यात कर्ज मिळवण्यासाठी उपयुक्त ठरते.

भारतीय बँकिंगमधील बचत खाते हे सामान्य नागरिकांसाठी आर्थिक व्यवहारांचा पाया आहे. त्यामुळे, खाते उघडण्यापूर्वी आणि वापरताना वरील सर्व नियमांची आणि तरतुदींची माहिती असणे आवश्यक आहे.

लाडोबा प्रकाशनाची दर्जेदार पुस्तके
आता तुमच्या घरी!
लाडोबा प्रकाशन


मराठी साहित्याचा अनमोल ठेवा, उत्कंठावर्धक कथा, प्रेरणादायी चरित्रे आणि वैचारिक साहित्याची मेजवानी घेऊन येत आहे लाडोबा प्रकाशन.
प्रत्येक पान तुम्हाला एका नवीन विश्वात घेऊन जाईल.


आमच्या प्रकाशनाची वैशिष्ट्ये
वैविध्यपूर्ण साहित्य : कथा, कादंबरी, काव्यसंग्रह आणि बालसाहित्य.
उच्च दर्जाची छपाई : वाचताना डोळ्यांना सुखद अनुभव देणारी मांडणी.
कल्पकता आणि संस्कारांची जोड : चित्रांच्या दुनियेतून साहित्याचा प्रवास
तुमची आवडती पुस्तके आजच ऑर्डर करा!
ऑनलाइन खरेदीसाठी लिंक : Website : www.chaprak.com
मुलांनो दिसामाजी काहीतरी चांगले वाचा!, लाडोबाची पुस्तके घरपोच मागवा!
लाडोबा-बालकुमारांचे लाडके मासिक

दरमहा ज्ञानाची नवी शिदोरी आणि मनोरंजनाचा खजिना हवा असेल, तर आजच लाडोबा मासिकचे सभासद व्हा.
'लाडोबा' मध्ये काय आहे खास?
रंगीत आणि आकर्षक चित्रे : ३ ते ५ वर्षांच्या चिमुकल्यांना चित्रांच्या माध्यमातून अक्षरांची ओळख करून देणारी रचना.
संस्कारक्षम कथा : ६ ते १४ वर्षांच्या मुलांसाठी बोधकथा, परीकथा, आणि साहसी कथा, ज्यातून नकळत चांगले संस्कार घडतील.
बुद्धीला चालना : मेंदूला खुराक देणारी शब्दकोडी, चित्रकोडी, आणि गणिताच्या गमतीजमती.
कला आणि कार्यानुभव : चित्रकला, ओरिगामी आणि टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवण्याचे धडे.
ज्ञानाचे भांडार : सामान्य ज्ञान (GK), विज्ञानातील गमती आणि निसर्गाची माहिती.

www.chaprak.com
संपर्क : ७०५७२९२०९२

# झुंज कॅन्सरशी : सकारात्मक कथन!




नागेश शेवाळकर
९४२३१३९०७१

**पती भारत संचार निगम लिमिटेड कंपनीत उपविभागीय अभियंता या उच्च पदावरून निवृत्त झालेले... पत्नी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या संस्थेतून निवृत्त... मुलगा आणि सून अमेरिकेत... त्यांचा गोंडस नातू... पुण्यासारख्या मेट्रो शहरात स्वत:ची सदनिका... असं सारं सुव्यवस्थित, सुनियोजित सुरू असताना एक भयानक, दुर्धर आजार कुटुंबात शिरतो. खरंतर कॅन्सर या आजाराचे निदान होताच सारे कुटुंब त्यातही पती-पत्नी हादरून गेले असते. परंतु केवळ इच्छाशक्ती, प्रचंड आत्मविश्वास, परमेश्वरावर श्रद्धा, संयम, धैर्य, येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याचा ठाम निश्चय, आयुष्यात जमवलेला लोकसंग्रह इत्यादी गोष्टींमुळे कॅन्सर या आजाराशी यशस्वीपणे झुंज देणाऱ्या दुधाळ या दांपत्याचे 'झुंज कॅन्सरशी' हे अनुभव कथन वाचताना हृदय गलबलून येते. या अनुभव कथनाचे लेखक आहेत, ज्यांनी पत्नीच्या आजारापणात काळजीवाहक ही भूमिका अत्यंत तन्मयतेने, जिव्हाळ्याने, संयमाने निभावली ते म्हणजे प्रल्हाद दुधाळ!**

प्रकाशक घनश्याम पाटील चपराक प्रकाशन पुणे आणि त्यांच्या चमूने हा संग्रह तितक्याच आत्मीयतेने आणि दुर्दैवाने कुण्या कुटुंबावर वेळ आलीच तर त्या कुटुंबाचा निरुत्साह कमी व्हावा, आलेल्या आजारावर मात करण्यासाठी आत्मबल वाढावे, प्रेरणा मिळावी या सद्हेतूने हा संग्रह उत्तमरीतीने, आकर्षकपणे प्रकाशित केला आहे. हे पुस्तक कर्करोग झालेल्या व्यक्तिने, त्या कुटुंबाने तर वाचलेच पाहिजेत परंतु तशी दुर्दैवी वेळ न आलेल्या प्रत्येकाने वाचले पाहिजे असे मनोबल वाढविणारे, सकारात्मक इच्छाशक्तीच्या जोरावर आपण कोणत्याही आजारावर यशस्वीपणे मात करू शकतो असा विश्वास निर्माण हे प्रामाणिक अनुभव कथन आहे.

आजाराची सुरुवात, योग्य डॉक्टर नि सुसज्ज इस्पितळ, आजाराचे निदान, निर्णय क्षमता, वेगवेगळ्या तपासण्या, किचकट औषधोपचार, वेळोवेळी - वक्तशीरपणे दवाखान्यात जाणे, मुख्य म्हणजे आर्थिक नियोजन हे सारे सोपस्कार वाटते तितके सोपे नसतात. म्हणतात ना अक्षरश: देव दिसला किंवा जो भोगतो त्यालाच त्या वेदनांची तीव्रता जाणवते. जो आजारी असतो तो तर सारे भोगतोच परंतु कदाचित त्याच्याहीपेक्षा जो सोबत असतो, स्वत:चे वय नि आजार विसरून रुग्णाची काळजी घेतो तोही भोगतो.

लेखक दुधाळ यांच्या पत्नी सौ. स्मिता दुधाळ! यांना कर्करोगाशी झुंज द्यावी लागली. या सर्व प्रवासात स्मिता स्वत: घाबरून गेल्या नाहीत कारण त्यांना पतीचा स्वभाव माहिती होता. मी जर खचले तर माझ्या पतीला जास्तच त्रास होईल. लेखक दुधाळ लिहितात, ''आम्हा सर्वांच्या मनावर दडपण असले तरी स्मिता मात्र तिच्या नावाप्रमाणेच स्मितहास्य करत ऑपरेशन थिएटरमध्ये गेली.'' या वाक्यावरून स्मिताताईंचा स्वभाव लक्षात येतो. पती-पत्नीचा एकमेकांवरील विश्वास, एकमेकांच्या स्वभावाची जाणीव नि एकमेकांना सर्वोपरी मदत करणे या चांगल्या बाबींची नकळत जाण हे कथन वाचताना येते.




आजारी व्यक्ती त्यातही असा अवघड आजार म्हटलं की, भेटायला येणारांची रीघ लागते. परंतु डॉक्टर अशा भेटी टाळण्याचा सल्ला देतात. विशेषत: कर्करोगाचा मुख्य औषधोपचार म्हणजे केमोथेरपी सुरू असताना हा सल्ला महत्त्वाचा ठरतो! या पद्धतीत रुग्णाच्या पांढऱ्या पेशी कमी होण्याची शक्यता असते. अशा प्रसंगी रुग्णाला कोणत्याही प्रकारचा संसर्ग होण्याची शक्यता असते. जर रुग्णाला संसर्ग झाला तर कॅन्सरचा औषधोपचार थांबवून नव्या पाहुण्या आजारावर औषधी द्यावी लागते. रुग्णाला सांभाळणाऱ्या व्यक्तिची जणू परीक्षेची घडी असते. अनेक जण समजून घेतात तर बरेचसे लोक नाराज होतात. प्रल्हाद दुधाळ हे लेखक असल्याने ते अशा व्यक्तिंबद्दल छान प्रकट होतात. लेखक लिहितात, ''काही जवळच्या नातेवाईकांनी मात्र माझ्या स्मिताच्या काळजीपोटी शक्यतो भेटायला येऊ नका. अशा दिलेल्या सूचनांचा गैर अर्थ लावून तिची अगदी फोनवर चौकशी करणेही टाळले. कदाचित फोनवरच्या बोलण्यामुळेसुद्धा तिला संसर्ग होऊ शकेल... असे त्यांना वाटले असावे.''

लेखक पुढे एक वास्तव लिहितात, ''आजारी माणसाच्या वेदना कुणी वाटून घेऊ शकत नाही, हे जरी खरे असले तरी योग्य वेळी केलेला आपुलकीचा एक फोन कॉलही पेशंटला प्रचंड उमेद देऊन जातो.''

समाजात व्यक्ती तितक्या प्रकृती नि प्रकृती तितक्या वृत्ती असतात. याचा अनुभव सुख-दु:ख दोन्ही प्रसंगी येतो. तसाच तो दुधाळ कुटुंबीयांनाही आला आहे, जो साहजिक नि नैसर्गिक आहे. लेखक लिहितात, ''या काळात एक धडा मात्र मिळाला की, आपण आयुष्यात ज्यांना सर्वात जवळचे समजतो, प्रत्यक्षात त्यांचे खरे रूप वेगळे असू शकते.''

त्याच बरोबर शेजारी, फिरताना दररोज भेटणारे लोक, नातेवाईक अगदी काही परिचित यांनीही भरपूर मदत केल्याचे लेखक आवर्जून सांगतात. एक मुस्लिम दांपत्य दररोज फिरायला गेले की भेटत असे. स्मिताताई आजारी आहेत हे समजताच या दांपत्याने दुधाळ यांना हज येथून आणलेले तीर्थ आणि माती देऊन दररोज पेशंटला द्यायला सांगितले. हे वाचताना मन भरून येते.

या संपूर्ण काळात अमेरिकेत राहणारा मुलगा, सून आणि त्यांचा नातू दोन वेळा भेटायला येतात तेव्हा दुधाळ कुटुंबात एक अनोखे आनंदी वातावरण निर्माण होते. तेव्हा दुधाळ दांपत्याचे संस्कार किती घट्ट रुजलेले आहेत समजून येते. नातू म्हणतो, ''आजी, काळजी करू नको. मी तुला भेटायला येणार आहे...'' हे वाचताना मन अस्वस्थ होते.

जेव्हा मुलगा, सून, नातू अमेरिकेतून भेटायला येतात तेव्हा स्मिताताईंची केमोथेरपी सुरू असताना एकदा नातू त्यांच्यासोबत दवाखान्यात गेला. आजीला इंजेक्शन देताना एखाद्या मोठ्या माणसाप्रमाणे म्हणाला, ''आज्जी... सुई टोचताना थोडेच दुखेल पण तू घाबरू नको!'' या छोट्याशा वाक्याने आजीला एक वेगळीच स्फूर्ती मिळाली असेल हे नक्की!

सारे काही व्यवस्थित सुरू असताना काही अडथळे नक्कीच आले. परंतु त्या कसोटीच्या काळात दुधाळ दांपत्याने न घाबरता त्यावर मात करताना संयम सोडला नाही. लेखक दुधाळ सेवानिवृत्त! त्यामुळे वय साठी पार! छोटामोठा आजार त्यांनाही असणारच! विशेषत: पत्नीच्या तब्येतीची, औषधपाणी वेळेवर देणे, दवाखान्यात ने-आण करणे यामुळे त्यांनाही अंगदुखी, थकवा याबाबी प्रकर्षाने जाणवत परंतु त्यांनी जणू एकच प्रण केला असावा तो म्हणजे थकायचं नाही, हरायचं नाही पत्नी सेवेचा घेतला वसा टाकायचा नाही. याबाबत लेखक लिहितात,''जसा मार्ग मिळेल तसे पुढे पुढे जायचे.'' त्यांचा हा संदेश थेट वसंत बापट यांच्या सदैव सैनिका पुढेच जायचे ना मागुती तुवा कधी फिरायचे! या ओळींप्रमाणे वाटतो. लेखक पुढे लिहितात, ''काही असे, काही तसे, जगलो असे, जमेल तसे!'' यावरून दुधाळ यांचा आत्मविश्वास लक्षात येतो. महत्त्वाचे म्हणजे स्मिताताईंना स्वत:च्या आजाराची माहिती होताच त्या स्वत: डगमगल्या नाहीत कारण त्यांना माहिती होते, मी खचले तर माझ्या पतीचे हातपाय थकतील. अगदी शेवटची एक शस्त्रक्रिया करण्याची सूचना डॉक्टरांनी केली. ह्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णांच्या शरीरात तसेच बाह्य दिसण्यात काही बदल होतील हे सांगून शस्त्रक्रिया करायची किंवा नाही हा निर्णय तुम्ही घ्यावा असे डॉक्टरांनी सुचवताच तिथल्या तिथे एका क्षणात त्या म्हणाल्या, ''आपल्याला कुठे आता या वयात सौंदर्य स्पर्धेला जायचंय?'' त्यांच्या ठाम निर्णयामुळे शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली.


केमोथेरपीची संख्या सोळा! म्हणजे सोळा वेळा दवाखान्यात जायचे म्हणजे वेगळीच धावपळ! एकदा मध्यंतरी पांढऱ्या पेशींची संख्या कमी झाल्यामुळे केमोथेरपी थांबवून पांढऱ्या पेशींची संख्या वाढण्याचे इंजेक्शन द्यावे लागले. आणखी एक व्यत्यय आला तो म्हणजे वाहनाचा! लेखक दुधाळ यांच्याकडे वाहन होते परंतु, अशा परिस्थितीत तुम्ही वाहन चालवू नका हा पत्नीचा सल्ला ऐकावाच लागला. इस्पितळ घराजवळ असल्यामुळे ऑटो किंवा टॅक्सी येत नव्हत्या. अधिकचे पैसे देऊनही नकार मिळत असे. एकदा ऑटो मिळाला नाही म्हणून लेखक स्मिताताईंना स्कुटरवर घेऊन गेले. तेव्हा त्यांना सतत मदत करणारा अमित रागावला. नंतर दवाखान्यातही कुणीतरी म्हणाले, ''केमोथेरपी चालू असताना रुग्णाला स्कुटरवर आणणे धोकादायक असते.''

केमोथेरपी सुरू असताना स्मिताताईंच्या डोक्यावरचे केस बरेच गळून गेले. कुणी भेटायला आले तर त्यांना संकोच वाटत असे. ते पाहून पती प्रल्हाद यांनी योग्य विग कुठे मिळतो का? ह्याचा शोध घेऊन पंचेचाळीस हजार रुपयांचा विग घेतला. विग संदर्भातील लेखकाने लिहिलेल्या माहितीमुळे वाचकांच्या ज्ञानात भर पडते. केमोथेरपी सुरू असताना स्मिताताईंना घरकाम करण्यासाठी कुटुंबीयांनी बंदी घातली. मुळात घरकाम करण्याची प्रचंड आवड असणाऱ्या स्मिताताईंना ही बंदी झालेल्या आजारापेक्षा दु:खदायक वाटत होती. एका भेटीत त्यांनी स्वत:च डॉक्टरांकडे बंदीचा प्रश्न मांडला. तेव्हा डॉक्टरांनी मी असे काहीही सांगितले नाही. तुम्ही नेहमीची घरकामे करू शकतात, असे सांगितले. तेव्हा स्मिताताईंना अर्धा आजार कमी झाला, असे नक्कीच वाटले असणार!

एकंदरीत श्री प्रल्हाद दुधाळ यांचे अनुभव कथन वाचताना अनेकानेक भावना दाटून येतात. परंतु या सर्व भावनांपेक्षा दुधाळ दांपत्याचे धाडस, संयम, सखोल विचार करून निर्णय घेणे, आत्मविश्वास, एकमेकांच्या भावना जपणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. हे पुस्तक सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही. उभयतांना खूप खूप शुभेच्छा!

| | |
|---|---|
| **झुंज कॅन्सरशी** | : अनुभव कथन |
| **लेखक** | : प्रल्हाद दुधाळ |
| **प्रकाशक** | : घनश्याम पाटील चपराक प्रकाशन |
| **पृष्ठ संख्या** | : ९६ |
| **मूल्य** | : १५०/- |

'चपराक' पुस्तकांसाठी स्कॅन करा.




## पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये

**महाराष्ट्रातील विविध भागांत प्रयोगशील उपक्रम राबवणाऱ्या शिक्षकांच्या कथा.**
**शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी मार्गदर्शक.**
**शिक्षणप्रेमी, शिक्षक, पालक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी एक अनिवार्य वाचन.**
**शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा लेखाजोखा.**

महाराष्ट्राला शिक्षकांची एक मोठी परंपरा लाभलेली आहे. खेड्यापाड्यांमध्ये अनेक शिक्षक आपल्या नावीन्यपूर्ण योगदानाने शिक्षण प्रक्रियेत योगदान देत आहेत. मी स्वत: शिक्षक म्हणून तीन दशकांहून अधिक काळ काम केलेले असल्याने अनेक चांगल्या शिक्षकांबद्दल मला पाहून, वाचून माहिती होते. 'चांगली माणसे मोजण्यासाठी हाताला हजार बोटे असावीत' असे भालचंद्र नेमाडे म्हणतात ते खरेच आहे. शोधायला गेले की आपल्या अवतीभोवती उत्तमोत्तम कार्य करणारे अनेक शिक्षक नजरेत येऊ लागतात.
**– डॉ. कैलास दौंड**

चपराक प्रकाशन www.chaprak.com

**संपर्क : ७०५७२९२०९२**
info@chaprak.com

# राजकीय भ्रष्टाचार

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या एका छोट्या शहरात अनिकेत नावाचा तरुण राहत होता. साधं घर, साधं आयुष्य, पण स्वप्नं मोठी. त्याचे वडील शिक्षक होते आणि आई अंगणवाडी सेविका. लहानपणापासून त्याने घरात एकच गोष्ट पाहिली होती प्रामाणिकपणा. वडील नेहमी सांगायचे, 'माणूस मोठा पदाने नाही तर चारित्र्याने होतो.' अनिकेतला ही वाक्यं मनापासून पटायची.

कॉलेजमध्ये असतानाच त्याला समाजकार्याची आवड निर्माण झाली. रस्ते, पाणी, शाळा लोकांच्या छोट्या छोट्या अडचणी त्याला मोठ्या वाटायच्या. हळूहळू तो लोकांच्या संपर्कात आला. त्याने आंदोलने केली, अर्ज दिले, अधिकाऱ्यांच्या दारात उभा राहिला. लोकं त्याच्यावर विश्वास ठेवू लागले. हा मुलगा काहीतरी करेल, गावात बोललं जाऊ लागलं. लोकांच्या आग्रहाने अनिकेतने नगरपरिषद निवडणूक लढवायचा निर्णय घेतला. सुरुवातीला त्याला वाटलं राजकारण म्हणजे सेवा. पण निवडणुकीच्या मैदानात उतरल्यावर त्याला कळलं राजकारण म्हणजे व्यवहार. पहिल्याच बैठकीत त्याला सांगितलं गेलं, फक्त काम करून निवडणूक जिंकता येत नाही. खर्च करावा लागतो. अनिकेत चकित झाला. किती खर्च? त्याने विचारलं. त्याला सांगितलेली रक्कम ऐकून तो शांत झाला. इतके पैसे त्याच्याकडे नव्हते. तेव्हा काही लोक पुढे आले.'तू जिंक. बाकी आम्ही पाहतो.'


अनिकेतला वाटलं हे लोक मदत करत आहेत. त्याने होकार दिला. निवडणूक जिंकली. पहिल्यांदा शपथ घेताना त्याच्या डोळ्यात अभिमान होता. त्याला वाटलं आता तो बदल घडवेल. पण लवकरच त्याला समजलं की बदल घडवणं इतकं सोपं नाही. पहिल्याच कामासाठी त्याने रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव दिला. कंत्राटदार त्याला भेटायला आला. काम होईल, तो म्हणाला, ''पण आपला हिस्सा ठरवूया.'' अनिकेतने नकार दिला. काही दिवसांनी प्रस्तावच अडला. तो पुन्हा कंत्राटदाराला भेटला. ''का अडलं काम?'' त्याने विचारलं. उत्तर सरळ होतं हिस्सा नाही, तर मंजुरी नाही. त्या रात्री अनिकेत झोपू शकला नाही. त्याच्या मनात संघर्ष सुरू झाला. तो स्वतःशी म्हणाला, ''मी पैसे घेणार नाही.'' पण त्याच वेळी दुसरा विचार आला कामच झालं नाही तर लोकांचं नुकसान होईल. दुसऱ्या दिवशी त्याने मौन सहमती दिली. पहिल्यांदा त्याच्या खात्यात काही रक्कम जमा झाली. त्याने स्वतःला समजावलं हे माझ्यासाठी नाही, कामासाठी आहे पण भ्रष्टाचाराची सुरुवात कधीच मोठ्या निर्णयाने होत नाही. ती लहान तडजोडीने सुरू होते. हळूहळू अनिकेत बदलत गेला. पूर्वी तो कामासाठी लोकांकडे जात होता. आता लोक कामासाठी त्याच्याकडे येत होते.



मयूर बागुल
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

लघुकथा

आणि प्रत्येक कामासोबत एक दर ठरू लागला. घरात बदल दिसू लागले. नवं घर, नवी गाडी, नवे कपडे. आईने एकदा विचारलं, इतके पैसे कुठून येतात? अनिकेतने उत्तर टाळलं. वडील मात्र शांत राहिले. त्यांच्या नजरेत प्रश्न होते. एक दिवस वडिलांनी त्याला थेट विचारलं, तू प्रामाणिक आहेस ना? अनिकेत काही बोलू शकला नाही. त्याच्या शांततेनेच उत्तर दिलं. भ्रष्टाचार आता त्याच्या आयुष्याचा भाग झाला होता. तो म्हणायचा सिस्टमच अशी आहे. पण प्रत्येक तडजोडीने त्याचा आत्मा कमकुवत होत होता. शहरात एक मोठा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर झाला. मोठं कंत्राट. मोठे पैसे. अनिकेतने त्यातही हिस्सा घेतला. काम सुरू झालं. पण दर्जा खालावलेला होता. साहित्य निकृष्ट होतं. त्याने पाहिलं. त्याला माहिती होतं. पण त्याने डोळेझाक केली. काही महिन्यांनी पाईपलाईन फुटली. पाणी वाया गेलं. शहरात टंचाई निर्माण झाली. लोक रस्त्यावर उतरले. अनिकेतवर आरोप झाले. तो म्हणाला, ''ही तांत्रिक चूक आहे.'' पण त्याला सत्य माहिती होतं. त्या रात्री त्याने आरशात स्वतःकडे पाहिलं. त्याला एक प्रश्न पडला, 'तो कोण झाला आहे?' ज्याने लोकांसाठी लढा दिला होता, तोच आता लोकांचं नुकसान करत होता. वडील आजारी पडले. रुग्णालयात त्यांनी त्याचा हात धरला. ''तू बदललास,'' ते हळूच म्हणाले. त्या शब्दांनी अनिकेतचं मन हादरलं. त्याला जाणवलं त्याने सत्ता मिळवली, पण स्वतःला हरवलं. शहरात चौकशी सुरू झाली. कागदपत्रं उघड झाली. त्याचं नाव समोर आलं. लोकांचा विश्वास तुटला. तो एकटा पडला. त्याच्या सभोवती असलेले लोक गायब झाले. ज्यांनी त्याला मदत केली होती, तेच आता दूर गेले. त्या दिवशी त्याला समजलं 'भ्रष्टाचारात साथीदार असतात, पण संकटात कोणी नसतं.' न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाली. माध्यमांनी बातम्या केल्या. अनिकेत शांत झाला. त्याने विरोध केला नाही. त्याला माहिती होतं ही शिक्षा फक्त कायद्याची नाही, तर त्याच्या विवेकाची आहे. शहरात पुन्हा निवडणूक झाली. नवीन नेतृत्व आलं. अनिकेतचा अध्याय संपला. तो एकेकाळचा आदर्श तरुण आता इशारा बनला. त्याची कथा लोक सांगू लागले. कारण राजकीय भ्रष्टाचार कधीच एका मोठ्या गुन्ह्याने सुरू होत नाही तो लहान तडजोडींच्या मालिकेतून वाढत जातो. सत्ता मिळवणं कठीण असतं, पण ती टिकवण्यासाठी प्रामाणिकपणा लागतो. अनिकेतने सत्ता मिळवली होती, पण तिची किंमत म्हणून त्याने स्वतःचं चारित्र्य गमावलं आणि शेवटी त्याला समजलं सत्तेपेक्षा मोठं काही असेल, तर ते म्हणजे विश्वास. तो एकदा गमावला की, कोणतीही सत्ता तो परत मिळवू शकत नाही.





भरत
विठ्ठल पाटील
मालेगाव, नाशिक
९६६५९११६५७

मज आवडते मनापासूनी शाळा



# मुलांच्या यशाची गुरुकिल्ली

''सर, कितीबी सांगितलं तरी ह्या मुली अभ्यासाकडे लक्षच देती नही. आमचं ऐकत नही. नुसता मोबाईल अन् टी व्ही पाहिजे यानले. कव्हा, मव्हा आयकती बी म्हना, पण आता काय करावं?''

अशी तक्रार घेऊन एक पालक शाळेत आले होते. त्यांच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसत होती. त्यांची व्यथा ऐकून त्यांना शांतपणे सांगितले,

''मुलं ऐकत नाहीत असं आपल्याला वाटतं हो पण प्रत्यक्षात त्यांचाही मूड आपल्याला जाणून घ्यावा लागतो. उठसूठ अभ्यास कर, याला ती कंटाळतात. ती खूप बारकाईने पाहत असतात. आपण काय बोलतो यापेक्षा आपण कसं वागतो हेच ते जास्त शिकतात.''

ते पुन्हा मला थांबवत बोलतात,

''आहो, एका ठिकाणी बसती नही, त्यानले सांगायला गेलं की साफ दुर्लक्ष करती आपल्याकडं. मग बसतो मार नि रडती थोबाड वासत.'' ते भरभर बोलतच होते. त्यांचे सारे संपूच दिले. जेव्हा त्यांचे झाले तेव्हा बोलू का म्हणून त्यांचीच परवानगी घेत बोलू लागलो त्यांच्या कलाने.

''भाऊ, तुमचे काहीच चुकीचे नाही. तुम्ही तुमच्या जागी बरोबर आहात. मुलंही त्यांच्या जागी बरोबर आहेत. थोडे वेळेचे नियोजन हे करावे लागेल. तुम्ही जसे दिवसभर शेतात असतात तसेच तेही दिवसभर शाळेत असतात. तुम्ही जसे शरीराने थकता तसे ते मनाने थकतात हे आधी समजून घ्या. त्यांच्या कलाने घेतल्यास सोपे होईल सारे.''

आलेले पालक आता मला काय सांगायचे आहे हे समजून घेत होते. त्यांना सोपी सोपी उदाहरणे देत मूल कसे समजून घेता येईल. त्याच्याकडून कसा अभ्यास करता येईल हे सांगत होतो. सांगितलेले त्यांना आवडले नि त्यांनी मान्य करत काय काय करता येईल हे सांगत पटकन निरोप घेतलाही. ते इतके लवकर गेले की संवाद अपूर्ण राहिला असे वाटून गेले. हा अनुभव अंतर्मुख करणारा होता.

आजच्या काळात मुलांचे लक्ष विचलित होण्याची अनेक कारणे आहेत. मोबाईल, दूरदर्शन, बदलती जीवनशैली, अभ्यासाचा वाढलेला ताण, स्पर्धा आणि पालकांच्या व्यस्त दिनचर्येमुळे मुलांना पुरेसा संवाद मिळत नाही. त्यामुळे अभ्यासाविषयी उदासीनता निर्माण होऊ शकते. मुलांमध्ये बदल हवा पण यांना वेळ नाही. हे जाणून घेतले होते.

अनेकदा आपण मुलांकडून फक्त चांगल्या गुणांची अपेक्षा करतो. पण त्यांचे मन समजून घेण्याचा प्रयत्न कमी करतो. प्रत्येक मूल वेगळे असते. कोणाला गणित आवडते, कोणाला चित्रकला, कोणाला खेळ, तर कोणाला वाचन. मुलांच्या आवडी, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक क्षमता ओळखून त्यांना प्रोत्साहन दिल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यांच्यासोबत नियोजन करायला हवं. अभ्यासाची सक्ती न करता ती भक्ती व्हायला हवी.

मी त्या पालकांना सांगितले, ''मुलाला सतत ओरडू नका. दररोज थोडा वेळ त्याच्याशी मैत्रीपूर्ण संवाद साधा. त्याच्या शाळेतील अनुभव ऐका. त्याचे छोटे-छोटे प्रयत्नही कौतुकाने स्वीकारा. जेव्हा मुलाला आपलेपणा आणि विश्वास मिळतो, तेव्हा तो आपोआप जबाबदार होऊ लागतो.'' हे त्यांना पटलं होते.

शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील धडे नव्हेत. शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्त्व घडविण्याची प्रक्रिया आहे. मुलांमध्ये जिज्ञासा, विचारशक्ती, आत्मविश्वास आणि चांगले संस्कार रुजविण्यासाठी घर आणि शाळा यांचे सहकार्य आवश्यक असते. पालक आणि शिक्षक एकाच दिशेने प्रयत्न करत असतील तर मुलांच्या प्रगतीचा मार्ग अधिक सुकर होतो. पुस्तकांशी मैत्री करायला त्यांना सांगायला हवं नव्हे तर स्वतः पुस्तक वाचत बसलं की ते आपोआप पुस्तक वाचतील. अनुकरण करतील. काही पालकांना तर नेहमीच सांगत असतो, की फक्त त्यांना शाळेत आज काय शिकवलं ते विचारत जा, म्हणजे ते आपोआप अभ्यासाला बसतील आणि तुम्हालाही कळेल की आज शाळेत काय शिकवले. त्याचा सकारात्मक परिणामही झाला. मुलांच्या चुका दाखविण्यापेक्षा त्यांचे गुण शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण प्रत्येक मुलामध्ये एखादी विशेष क्षमता दडलेली असते. तिला योग्य दिशा मिळाली तर ते मूल केवळ अभ्यासातच नव्हे तर जीवनातही यशस्वी होऊ शकते. त्यांच्या आवडीचा शोध घेतला की ते लक्षच देती नही हा प्रश्न निर्माण होणारच नाही असे वाटून गेले होते. शेवटी त्या पालकांना निरोप देताना एवढेच सांगितले, ''मुलांवर लक्ष ठेवा, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांना वेळ द्या. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यापेक्षा त्यांच्याशी नाते जोडा. कारण प्रेम, विश्वास आणि संवाद हीच मुलांच्या यशाची खरी गुरुकिल्ली आहे.''


मुलांना शिकविण्यापूर्वी त्यांना समजून घेणे गरजेचे आहे. कारण जे मूल ऐकले जाते, तेच पुढे शिकण्यास उत्सुक होते. अभ्यासाशी मुलाचं नातं जोडायला हवं त्यासाठी त्यांचं मन जाणून घ्यायला हवं म्हणजे त्यांची नेटकी जडणघडण होते.




# सत्याचा मार्ग म्हणजे प्रकाशाची वाट



संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०




**मानवी जीवनामध्ये निर्माण झालेली पाऊलवाट नेमकी कोणत्या दिशेने घेऊन जायची? यासाठी अनेकांनी मार्गदर्शन केले आहे. आपले साधू, संत, महापुरुष, ऋषी, मुनी हे सर्वच जीवन एका उंचीवर घेऊन जायचं असेल तर 'सत्याच्या वाटेवर चला' असे सांगत आले आहेत. म्हणून सामान्य माणसं या महापुरुषांचे ऐकत सत्याच्या वाटेचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. पण सत्य ही गोष्ट नेमकी कशी आहे? कशाला सत्य म्हणायचे हे मात्र अजूनही उमगलेलं नाही. आपल्या डोळ्याला दिसते ती सत्य आहे का? आपल्या कानाला ऐकू येते ते सत्य आहे का? आपण ज्या विषयावर चर्चा करतो, मत प्रतिपादन करतो ते सत्य आहे का? आपण रस्त्यावरून जात असताना उन्हाळ्याचे दिवस आहेत आणि डांबरी रस्तेवर कुठेतरी पाण्यासारखा भाग चमकू लागतो. आपण त्या दिशेने पुढे गेलो की, मग लक्षात येते की, तिथे पाणी नाही ते एक मृगजळासारखे भासमान असणारे जल आहे. प्रश्न असतो, आपण पाहिले ते सत्य की आपण आता अनुभवतो ते सत्य? असा प्रश्न मनात निर्माण होतो.**



सत्य सांगण्याची, बोलण्याची अथवा शोधण्याची गोष्ट ती अनुभवण्याची गोष्ट आहे. सत्याला अनुभवता येते. त्याला ते जाणून घेता येते. जाणून घेता आलं की जीवनाच्या वाटेवरचा प्रवास सुलभ होण्यास मदत होते. मग तो तर्काच्या जोरावर सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत नाहीत. ओशो यासंदर्भात अत्यंत चांगली गोष्ट सांगताय. एकदा ओशो आपल्या शिष्यांसोबत ध्यान प्रवचनाला बसले होते. तेथे उपस्थित असलेल्या शिष्यांनी ओशोंना प्रश्न विचारला, ''गुरुजी, सत्य म्हणजे काय? आम्ही त्याला कसं मिळवू शकतो?''

ओशो थोडं हसले. त्यांनी आपल्या अवतीभवती पाहिले. त्यांच्या जवळच ठेवलेलं एक फूल होते. ते त्यांनी हातात घेतले. फुलाकडे थोड्यावेळ पाहिले. शिष्य थोडेसे विचारांमध्ये गढून गेले होते. त्यांना कळेना की आपण आपल्या गुरुजींना प्रश्न विचारला आहे आणि गुरुजी दुसरेच काही शोधत आहेत. त्यांनी बाजूला असलेले फूल हातात घेतले आणि शिष्यांना म्हणाले, ''या फुलाकडे पाहा. याचा सुगंध तुम्हाला जाणवतो का?''

सर्व शिष्यांनी मान हलवली आणि मान हलवतच प्रश्नाचे उत्तर दिले. ओशो पुढे म्हणाले, ''सुंगध तुम्ही अनुभवत आहात, पण तो पकडू शकता का? तुम्ही त्याला हातात धरू शकता का? नाही! सुगंध हवेत पसरतो, तो अनुभवता येतो पण पकडता येत नाही.''

थोडा विराम घेऊन ओशो म्हणाले, ''सत्यही असंच आहे. सत्याला पकडण्याचा प्रयत्न करू नका. सत्य ही वस्तू नाही, ती अनुभूती आहे. ज्याप्रमाणे फुलाचा सुगंध हवेत पसरतो, तसंच सत्य मनात पसरतं. त्याला पकडण्याचा प्रयत्न म्हणजे व्यर्थ धडपड. त्याला अनुभवण्याची तयारी ठेवा.''

सत्य ही अनुभवण्याची गोष्ट आहे. हे ओशोंनी लक्षात आणून दिले होते. ओशो सांगतात की, माणूस नेहमी सत्याला ज्ञान, तर्क, सिद्धांत यामध्ये पकडण्याचा प्रयत्न करतो. विविध साधनांद्वारे आपल्याला सत्य सापडेल असे त्याला वाटत असते. हुशार असलेल्या माणसाला सत्य पकडण्यासाठी तर्क, ज्ञान कामी येईल, असे त्याला वाटते पण शहाणी आणि विवेकी असलेली माणसं या मार्गाने जाणे पसंत करत नाही. पण सत्य हे पुस्तकात, शब्दात किंवा सिद्धांतात नसतं.

ओशो पुढे म्हणतात की, ''सत्य हा अनुभव आहे. आपण एखाद्या व्यक्तीवर प्रेम करतो ते प्रेम अंतर मनातून असेल तर आपण त्यात डुंबून जातो. पण आपल्याला कोणी विचारलं या प्रेमात तुला काय मिळाले आहे? तर आपण त्याला काय सांगू शकतो. प्रेमातला आनंद, डुंबणे ही सांगण्याची गोष्ट नाही. ती अनुभवण्याची गोष्ट आहे आणि आपण असे घेतलेले अनुभव शब्दात पकडता येत नाहीत. प्रेमात शब्द मुख्य होता आणि भाव बोलके होतात. जसं प्रेमाला शब्दांत सांगता येत नाही, तसंच सत्यालाही सांगता येत नाही. ते फक्त जगता येतं, अनुभवता येतं.''

### जीवन उन्नतीची दिशा

सत्याला आपण वस्तूसारखं पकडू शकत नाही. ते फक्त अनुभवता येतं अनुभव महत्त्वाचा सत्य हे बौद्धिक विचारांपेक्षा अनुभवण्याची गोष्ट आहे. जसं सुगंध हवेत पसरतो, तसंच सत्य मनात पसरतं. आपल्याला सत्याचा शोध घ्यायचा असेल, सत्यचा मार्ग निवडायचा असेल तर आपण ठरवतो तो मार्ग सत्याचा असेलच असे नाही. त्या पलीकडेही सत्याचा मार्ग असू शकतो. सत्याचा मार्ग म्हणजे प्रकाशाची वाट आहे. सत्याचा मार्ग म्हणजे जीवन उन्नतीची दिशा आहे. सत्याचा मार्ग म्हणजे जीवनातील परमोच्य क्षण आहे. मग तो क्षण शब्दांच्या सहवासात मिळण्याची शक्यता अजिबात नाही. आपल्याला खरोखर सत्याचा शोध घ्यायचा असेल, सत्याचा सहवास हवा. सत्य अनुभवायचे असेल तर आपल्याला सत्याची अनुभूती घ्यावी लागेल.

मानवी जीवनातील अहंकार सोडला की सत्याचा शोध लागू शकतो. सत्य अनुभवण्यासाठी मन रिकामं करावं लागतं. अहंकार, तर्क, सिद्धांत यांना बाजूला ठेवावे लागते. ध्यान म्हणजे सत्य अनुभवण्याचा मार्ग आहे. जेव्हा आपण पकडण्याचा प्रयत्न सोडतो तेव्हा आपण ध्यानात आहोत असं समजावे.

### अहंकाराचा त्याग करायला हवा

आपण ध्यानाला बसलो आहोत तरी आपल्या सोडावे वाटत नाहीत तर समजावं आपला ध्यानाचा मार्ग चुकीचा आहे. ध्यानामध्ये आपण अहंकाराचा त्याग करायला शिकले पाहिजेत. ध्यानात आपण पकडण्याचा प्रयत्न सोडतो आणि अनुभवण्याची तयारी ठेवतो. आपण नेहमी सत्याला पुरावा, तर्क, सिद्धांत यामध्ये शोधतो. पण सत्य हे जीवनाचा अनुभव आहे. जसं प्रेम, आनंद, मौन हे अनुभव आहेत, तसंच सत्यही आहे. सत्याला पकडण्याचा प्रयत्न म्हणजे हातात वारा पकडण्यासारखं आहे. एखाद्या व्यक्तीला प्रेम झालं तर तो अनुभव सांगू शकतो, पण शब्दांत पूर्णपणे व्यक्त होण्याची शक्यता अजिबात नाही. तसेच ध्यानात सत्याचा अनुभव येतो, पण तो शब्दांत पकडता येत नाही.

### उलगडेल जीवनाचे सौंदर्य

ओशोंची ही कथा आपल्याला सांगते की सत्य हे पकडण्यासारखं नसते ते अनुभवायचे असते. जसं फुलाचा सुगंध हवेत पसरतो आणि आपण त्याचा आनंद घेतो, तसंच सत्यही आपल्या जीवनात अनुभवायचं असतं. सत्याला पकडण्याचा प्रयत्न सोडून, अनुभवण्याची तयारी ठेवली की जीवनाचं सौंदर्य उलगडतं.

सत्य हे बौद्धिक विचारांपेक्षा अनुभवात आहे. ध्यान, मौन, प्रेम यामध्येच सत्याचा सुगंध आहे. त्याला पकडण्याचा प्रयत्न करू नका फक्त अनुभव घ्या. ओशो यांच्या प्रवचनांमध्ये नेहमीच जीवनाचा गूढ अर्थ उलगडला जातो. त्यांनी सत्य, ध्यान, प्रेम, आनंद याबद्दल अनेक कथा सांगितल्या आहेत. ही कथा आपल्याला सांगते की सत्य हे पकडण्यासारखं नसून अनुभवण्यासारखं आहे.

# जपावं असं फुलणं...



मंगेश दौंडकर
भोसरी, पुणे
९८९०६१९३५४

सह्याद्री म्हटलं की डोळ्यांसमोर उभी राहते ती उत्तुंग कड्यांची पर्वतरांग. हिरवाईने नटलेली अन् ऋतुंनी सजलेली. काळाच्या ओघातही आपल्या सौंदर्याची मोहिनी टिकवून असलेली अजब शृंखला. महाराष्ट्राच्या हृदयात वसलेली ही निसर्गसंपन्न रांग म्हणजे जैवविविधतेचा एक खजिनाच. इथल्या प्रत्येक वळणावर, प्रत्येक दरी-खोऱ्यात निसर्गाने अगणित रत्नं दडवून ठेवली आहेत. याच सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेली परंतु अजूनही फारशी न उलगडलेली एक नाजूक, अल्पायुषी परंतु विलक्षण सुंदर कविता म्हणजे – रानफुलं.

वर्षाऋतुची चाहूल लागली की सृष्टीला जणू नवसंजीवनीच मिळते. पावसाच्या प्रत्येक थेंबाने तिच्या कुशीत नवं जीवन फुलतं. स्वप्नांची उधळण होते. डोंगरातल्या एखाद्या शांत वाटेवरून जाताना, तो रानफुलांचा नाजूक स्पर्श मनाच्या गाभाऱ्यात खोलवर रुजतो. कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय वाढणाऱ्या या रानफुलांची कलाकुसर म्हणजे निसर्गाने स्वतः रेखाटलेली एक सुंदर, रंगीबेरंगी आणि सुगंधी कलाच म्हणावी लागेल. रानफुलांच्या मांडणीमध्ये त्यांचे रंग, गंध, पानांची रचना आणि उमलण्याची वेळ हे सगळं इतकं समरस आहे की निसर्ग हा एक अतुलनीय कलाकार आहे हे आपल्याला मान्य करावंच लागेल.

पावसाळा संपत आला की निसर्ग रंगपंचमी खेळू लागतो. आकाश मोकळं होतं, ढग परतीची वाट धरतात आणि डोंगरवाटा नानाविध रंगांनी न्हाऊ लागतात. सोनकीची पिवळी तेजस्वी किरणं चौफेर पसरू लागतात. तुरट्याची निळसर झाक सृष्टीच्या सागराला गूढतेची किनार देते. सीतेची पारदर्शक आसवं, अभोळीचं देखणं रुपडं आणि टाचणी फुलाचं बारकाईनं विणलेलं सौंदर्य हे सगळं अनुभवताना असं वाटू लागतं की ही केवळ फुलं नाहीत. त्या पलीकडचं काही तरी आहेत. त्या अनोख्या सौंदर्यात निसर्गाच्या गूढ भाषेतील शब्द आणि अनुभवांच्या कविता दडलेल्या आहेत. आपल्या मनाशी हितगुज करता करता ही फुलं अंतर्मनातल्या कोपऱ्यात कधी शिरकाव करतात कळतही नाही. रानफुलं ना कुणी पेरलेली, ना कुणी वाढवलेली. तरीही त्यांचं अस्तित्त्व इतकं सुंदर, सहज आणि बोलकं असतं की त्यांच्या गंधात आणि रंगात हरवून जावं. ना शृंगार ना प्रसिद्धीची हाव. त्यांचं साधेपण हेच त्यांचं सौंदर्य. एकीकडे ती सौम्य, गोड आणि नाजूक असतात तर दुसरीकडे ती प्रतिकूल परिस्थितीला तोंड देणारी, खंबीर आणि आत्मनिर्भर असतात. ऊन, वारा आणि पावसाच्या सरी झेलत, मिळेल त्या जागी ती आपलं अस्तित्त्व टिकवत असतात. मनात जिद्द असली की कठीण परिस्थितीतही फुलता येतं, हेच जणू ती सांगत असावीत. आज मानवी हव्यासाने, शहरीकरणाच्या विस्ताराने आणि वाढत्या पर्यटनामुळे रानफुलांचं विश्व विखुरलं जात आहे. त्यांच्या अस्तित्त्वावरच प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. त्यांचं निःशब्द विझणं हे केवळ एक नैसर्गिक संकट नाही तर आपल्या पर्यावरणाच्या, संस्कृतीच्या आणि आगामी पिढ्यांच्या स्वप्नांच्या विघटनाचं चिन्ह आहे. सह्याद्रीची ही अमृतवेल अशीच फुलत राहावी असं वाटत असेल तर आपण सर्वांनी मिळून आताच कठोर पाऊल उचलणं गरजेचं आहे. थोडं संवेदनशील व्हा, जागरूक व्हा आणि रानफुलांच्या अस्तित्त्वासाठी आपली साथ द्या.

प्रति,



सोमवार, दि. २७ जुलै ते २ ऑगस्ट २०२६
साप्ताहिक चपराक www.chaprak.com
PRGI No. MAHMAR/2011/35979

'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा
संपर्क : ७०५७२९२०९२

# वारकरी संप्रदायाच्या परंपरेत 'चपराक'चे योगदान : साबळे

## पंढरपूरमध्ये आषाढी एकादशीला हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत 'संत महिपती' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे** : ''आद्य संत चरित्रकार महिपती महाराज ताहाराबादकर यांचे चरित्र आणि कार्य जगभर पोहोचावे यासाठी 'चपराक'ने कायम पुढाकार घेतला आहे. महाराजांवर विशेषांक प्रकाशित करणे, वेळोवेळी त्यांच्याविषयी प्रासंगिक लेख लिहिणे, दिल्लीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील प्रकाशन मंचाला महिपतींचे नाव देणे यासाठी घनश्याम पाटील यांनी जाणीवपूर्वक यशस्वी प्रयत्न केले आहेत. आज महिपतींवरील सचित्र पुस्तक प्रकाशित करून वारकरी संप्रदायाच्या परंपरेत योगदान दिले आहे,'' असे मत संत महिपती महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष राजेंद्र साबळे यांनी व्यक्त केले.

पंढरपूरमधील संत महिपती भक्त निवासात आषाढी एकादशीनिमित्त लाडोबा प्रकाशनच्या 'संत महिपती' या चरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले त्यावेळी साबळे बोलत होते. यावेळी हजारो वारकरी उपस्थित होते.



अठराव्या शतकात संत कवी महिपती महाराज ताहाराबादकर यांनी महाराष्ट्रातील १६८ आणि महाराष्ट्राबाहेरील ११६ अशा २८४ संतांची काव्यमय चरित्रे लिहिली. आपल्याला असंख्य संतांची चरित्रे कळतात ती त्यांच्यामुळेच.

यावेळी चपराकचे प्रकाशक घनश्याम पाटील, कार्यकारी संपादक प्रमोद येवले, लेखक दत्तात्रेय नाईकवाडे, संत महिपती महाराज देवस्थानचे महंत ह.भ.प. अर्जुन महाराज तनपुरे, भागवताचार्य आदिनाथ हारदे, सोलापूर पत्रकार संघाचे सरचिटणीस सागर सुरवसे आदी उपस्थित होते.

संत महिपतींनी संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताई, संत गोरोबा, संत चोखोबा, संत कबीर, बोधलेबुवा, गणेशनाथ उद्धव, दिद्धन, विसोबा खेचर, संत सेना महाराज, संत रोहिदास अशा संतांची रसाळ चरित्रे लिहिली. त्यांचे भक्तविजय, कथा सारामृत, भक्तलीलामृत, संतलीलामृत, संत विजय असे अनेक ग्रंथ वारकरी संप्रदायात प्रातःस्मरणीय आहेत. त्यांनी लिहिलेलं पंढरी महात्म्य, अनंतव्रत कथा, दत्तात्रेय जन्म, तुळशी महात्म्य, गणेशपुराण, पांडुरंग स्तोत्र, मुक्ताभरणकथा, कृषिपंचमी महात्म्य, अपराधनिवेदन स्तोत्र या स्फुटासह अनेक अभंग, आरत्या, पदे, सारांश ज्ञानेश्वरी असं लेखन वारकरी संप्रदायाची पताका अभिमानानं डौलत ठेवली. अशा या संत चरित्रकाराचे चरित्र त्यांच्याच गावातील दत्तात्रेय नाईकवाडे यांच्यासारख्या लेखकानं लिहिणं ही गौरवाची बाब आहे, असे घनश्याम पाटील यांनी सांगितले.

> आषाढी एकादशीला हे चरित्र प्रकाशित होणे ही माझ्यासाठी गौरवाची बाब आहे. विशेषतः वारकरी संप्रदायाबरोबरच पालक, शिक्षकांसह विद्यार्थ्यांसाठी हे चरित्र प्रेरणादायी ठरेल. त्यासाठी चपराक आणि लाडोबा प्रकाशनने घेतलेला पुढाकार महत्त्वपूर्ण आहे.
>
> **– दत्तात्रेय नाईकवाडे,**
> संत महिपती पुस्तकाचे लेखक